## प्रत्ययकारी साहित्यिक दांपत्य :
## श्री दिलीप आणि सौ. शोभा चित्रे



**श्री.** दिलीप चित्रे आणि सौ. शोभा चित्रे हे दांपत्य वॉशिंग्टनच्या परिसरात गेली चाळीस वर्षे वास्तव्य करून आहेत. नुसतेच वास्तव्य करून नव्हेत तर अनेक चैत्र उन्हाळे पाहूनही, दरवर्षी अमेरिकन "स्प्रिंग" मधल्या नव्या पालवीने बहरणारे हे चिरतरुण "आनंदाचे झाड" आपुली अभंग नाती जपत डोलत आहे, हसते आहे आणि टवटवीत राहून 'जगते' आहे.

दिलीप मुळचे बडोद्याचे पेशाने 'आर्किटेक्ट' , पण त्यांचा पिंड आहे अस्सल कलावंताचा. त्यातून त्यांना श्री. माधव आचवलासारखा गुरू भेटला. चित्र्यांच्या अंगभूत गुणांवर अभिजात संस्कार आचवलांनी केले. 'अभिरूची', 'मौज' यासारख्या मान्यवर मासिकातून दिलीपच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. १९६९ मध्ये ते लंडनला एक यशस्वी वास्तुविशारद - आर्किटेक्ट म्हणून स्थायिक झाले. दोन वर्षांनी १९७१ मध्ये ते अमेरिकेत आले...... ते आजतागायत.

सौ. शोभा चित्रे मुळच्या मुंबईच्या. त्यांनी नागपूर विद्यापीठातून बी.ए.ची पदवी घेतली. लग्नानंतरचे त्यांचेही वास्तव्य लंडन आणि अमेरिकेतच आहे. त्यांचे 'गोठलेल्या वाटा' आणि 'गौरी, गौरी कुठे आलीस?' हे ललित लेखसंग्रह आणि 'पानगळीच्या आठवणी' हे आत्मनिवेदनात्मक ललित लेखन, पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले आहे. सौ. शोभा चित्रे यांना त्याबद्दल 'महाराष्ट्र राज्य पुरस्कार' आणि 'अनंत काणेकर पुरस्कार' मिळाले आहेत, तर दिलीप चित्रे यांचा 'हिमगंध' हा कवितासंग्रह आणि 'अलिबाबाची हीच गुहा' हे नाटक भारत आणि अमेरिका या दोन्ही ठिकाणी गाजले आहे. 'हिमगंध' हा दिलीपचा कवितासंग्रह अमेरिकेतील मराठी कवीचा पहिला कवितासंग्रह आहे.

पण केवळ लेखक-कवी हा दिलीप चित्र्यांचा एकच पैलू नाही. उत्तर अमेरिकेतील मराठी माणसांच्या मनाशी संलग्न असलेल्या विविध प्रयोगांचे ते 'पहिले' संयोजक

आहेत. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, "माझ्या हौसेखातर मी बऱ्याच गोष्टी केल्या, ज्या तोपर्यंत कोणीच केल्या नव्हत्या. उदा: १९७५ साली 'कोलंबिया युनिव्हर्सिटी'च्या रेडियो स्टेशनवरून मी अमेरिकेतला पहिला मराठी रेडियो कार्यक्रम सादर केला होता. त्या आधी १९७१ साली लंडनला असताना पहिल्या 'दिपावली लंडन विशेषांकाला' मी जबाबदार होतो. तसेच १९७९ साली, अमेरिकेतील पहिली "अैलतीरावर" ही ध्वनिमुद्रिका मी प्रकाशित केली. १९८२ मध्ये अमेरिका आणि कॅनडा मधील पहिल्या मराठी चित्रपट महोत्सवाचे मी संयोजनही केले होते. सतत बारा वर्षे प्रयत्न करून १९८५ मध्ये 'कुंपणापलीकडचे शेत' हा भारताबाहेरील लेखकांचा पहिला प्रातिनिधिक कथासंग्रह प्रकाशित केला होता. 'अलिबाबाची हीच गुहा' हे माझे अमेरिकेत लिहिले गेलेले पहिले मराठी संगीत नाटक आहे."

चित्र्यांनी कथाकथन, नाट्यनिर्मिती-दिग्दर्शन, काव्यवाचन या सारखे अनेक कार्यक्रम केले आहेत. त्यांनी 'केसरी' मध्ये 'वॉशिंग्टनचे वार्तापत्र' ह्या नावाचे स्तंभलेखन केले. १९९० च्या सुमारास 'एकता' मासिकात 'चंद्रमुखी' या टोपणनावाने, कविता समस्यापूर्तीचे सदरही त्यांनी अनेक वर्षे चालवले. या सगळ्या प्रकल्पांत 'कुंपणापलिकडचे शेत' ही त्यांच्या दृष्टीने त्यांची सर्वांत मोठी कामगिरी आहे. १९७५ ते १९८५ या दशकात आता सारख्या सेलफोन्स, कंप्युटर्स, फॅक्स वगैरे सुविधा उपलब्ध नसताना, विविध देशांतील लेखकांकडून साहित्य मिळवणे हे खूप कठीण होते. तसेच लेखनात परदेशात राहण्याचे नुसते कौतुक नको होते. त्यांच्या जीवनाचे अनुभव हवे होते. गंमत अशी की लोक केवळ प्रवास करण्यासाठी परदेशी जातात. पंधरा दिवस फिरतात आणि आमच्या जीवनाबद्दल लिहितात. केवळ काठावरून सुखदु:खं कळत नाहीत. कुंपणा पलिकडचं शेत लांबून नेहमीच हिरवंगार दिसतं. त्यावरून चालायला लागलं की खरं कळतं. ते अनुभव या पुस्तकात दिसतात.

शोभा चित्रे ही तसंच म्हणतात. परदेशातील भारतीयांबद्दलचं चुकीचं लेखन वाचून त्यांना वाईट वाटायचं. आई म्हणून रागही यायचा की इथल्या मुलांबद्दल तुम्ही असं कसं लिहिता ? आणि मग त्यांनीच लिहायला सुरुवात केली. ते लेख म्हणजे "गोठलेल्या वाटा". परदेशात राहणं म्हणजे केवळ गाड्या, मॉल्स, ऐश्वर्य याचं वर्णन नाही. तेथे पोहोचेपर्यंत पडणारे कष्ट लोकांना दिसले पाहिजेत. लिहिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा एक प्रवास होत असतो. शोभा चित्र्यांचा प्रवास 'गोठलेल्या वाटां'पासून 'गौरी, गौरी कुठे आलीस ?' पर्यंत जातो. 'पानगळीच्या आठवणी' हे जरी आत्मनिवेदन असले, तरी त्यात 'अल्झायमर्स' सारख्या आजाराबद्दलची जाणीव लोकांपर्यंत पोहोचते.

बरीच वर्षे असे स्वतंत्र पण side by side लेखन केल्यानंतर, चित्रे पतीपत्नींनी अनुवाद केलेले "मीना : अफगाण मुक्तीचा आक्रोश" हे पुस्तक प्रसिद्ध झाले. मेलडीचे व्हिस यांच्या 'मीना-हिरॉईन ऑफ अफगाणिस्तान' या इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे.

एकदा आपला देश सोडून इथे राहू लागल्यावर भावना प्रगल्भ होत जाते. "पण जायचेच आम्हाला या नव्याच वाटेवरूनी" हीच प्रवृत्ती चित्रे पतीपत्नींच्या विचाराचा गाभा आहे असे दिसते. ते लोकांच्यातच "देव" पाहतात. त्यांच्या मते रूढी, व्रतवैकल्यात देव नाही. त्यावर त्यांची श्रद्धा नाही. अमेरिकेत सुद्धा स्त्रिया मोठ्या प्रमाणावर हळदीकुंकू करतात. शोभा चित्र्यांना वाटतं की या स्त्रियांनी एकत्र येऊन चांगलं काहीतरी करावं, चॅरिटी सुरू करावी, डोनेशन्स द्यावी. असं होत नाही याचं त्यांना वाईट वाटतं. त्या म्हणतात, "या रूढी पकडून ठेवण्यामागे काय असेल याचा विचार केला, तर आपण आपल्या समाजापासून दूर आहोत तर त्यातलं काहीतरी जास्त जपण्याचा प्रयत्न करणे हे एक कारण असावं. पण जुन्या चालीरिती जपल्या म्हणजे आपली संस्कृती जपली असं नाही. आपल्या सगळ्या रूढींना सामाजिक संदर्भ आहेत, धार्मिक नाहीत. ज्या काळी बायकांना बाहेरचं जग नव्हतं, लहानपणी लग्नं व्हायची, माहेरची आठवण यायची, तेव्हां मुलींना एकटं वाटू नये, काही करमणुकीचे साधन, मैत्रिणी मिळवण्याचे साधन म्हणून या रूढी होत्या. आता त्या कालबाह्य झाल्या आहेत. तसंच काही पालकांचा आग्रह असायचा की आपल्या मुलांनी भारतीय मुलांशीच मैत्री करावी. पण बाकीचं ही कल्चर पहा, अनुभवा. Let them grow. प्रत्येकात चांगलं आणि वाईट असतं. तर जे चांगलं ते पहायला शिका ना! ज्या पालकांनी आपल्या मुलांवर अशी बंधने घातली, त्यांच्याच मुलांनी मग त्यांना हवं तेच केलं. मुलं अनुकरण करतात, त्यांना आपल्या व्हॅल्यूज शिकवाव्यात. बोलणं एक आणि आचरण दुसरं असं नको."

अमेरिकेत इतके वर्ष राहून मागे वळून बघताना स्वतःच्या आयुष्यात घडलेल्या बदलांबद्दल दिलीप म्हणतात, "भारतात माझा स्वतंत्र व्यवसाय होता. तेथेच राहिलो असतो तर कदाचित आत्ताच्यापेक्षा जास्त पैसेही मी मिळवले असते. म्हणून अमेरिकेने सांपत्तिक सुख-समृद्धी दिली असे 'बदल' म्हणून मी म्हणणार नाही. येथे येऊन मला समाजकार्याची आवड-गोडी लागली, अनेक विविध क्षेत्रांत काम करण्याची संधी मिळाली व त्याचबरोबर व्यक्तिमत्वाचा आणि स्वतंत्र विचारांचा विकास झाला हे मात्र निश्चित!"

आयुष्यात खऱ्या अर्थी 'सहजीवन' जगणारे चित्रे पतीपत्नी ही 'माणसांतली'

माणसे आहेत. त्यांच्या घरात होणारं आदरतिथ्य...... त्यांच्या घरी जाऊन बघा, तुम्हालाही तोच अनुभव येईल.

आणि गंमत म्हणजे असे हे माणसांत 'रंगणारे' आणि माणसे 'रंगवणारे' दिलीप चित्रे चित्रकार ही आहेत. रोजच्या जीवनाच्या धावपळीतून बाहेर पडतात ते निसर्गाच्याच सान्निध्यात! रंगूनी रंगांत मधुर!!

सौ. मोनाली फाटक

************

(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि "मायबोलीचा विश्वसेतू" च्या सह-संपादकांच्या परवानगीने "मायबोलीचा विश्वसेतू" या पुस्तकातून. दिलीप चित्रे हयात असताना हा लेख लिहिला गेला होता. आता आम्ही तो श्रध्दांजली स्वरुपात वापरत आहोत.)